# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब-क्षेत्रिय कार्यालय, एल्प्रो कंपनी परिसर, लिंक रोड, चिंचवडगांव, पुणे-३३.
(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)
Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in
दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३

जावक क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ९२ /२०१९ दिनाक ४ /०२/२०१९

प्रति.
मा. श्री./श्रीमती-----------------------------------------,
प्रभाग क्र.------------------------------------------,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

विषय : ब प्रभाग समितीची मासिक सभा दि. ०६/०२/२०१९ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ०६/०२/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे, हि विनंती

कळावे,

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत : सर्व संबंधित शाखा प्रमुख.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

ब प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्र. ११

दिनांक : ०६/०२/२०१९.

वेळ : दुपारी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०६/०२/२०१९. रोजी दुपारी १२.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) मागील कार्यपत्रिका क्र. १०, दिनांक ०५/०१/२०१९ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणे

विषय क्रमांक १ प्रभाग क्रमांक १७ मधील बिजलीनगर चौक ते चिंचवडे फार्म चौक या दरम्यान नव्याने झालेल्या ओपन जिमला कै.धोंडू तात्या चिंचवडे व्यायामशाळा, माजी उपनगराध्यक्ष पिंपरी चिंचवड महानगरपालिका असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.करुणाताई चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक २ ब क्षेत्रीय कार्यालयामध्ये कार्यकाळ पुर्ण केलेले अध्यक्ष यांचे फोटो लावण्यात यावेत त्याचबरोबर मा.अध्यक्ष आणि गठीत केली गेलेली समिती यामध्ये सन्मा.समिती सदस्य यांचा देखील नामोउल्लेख असलेला फलक कार्यालयात लावावा, क्षेत्रीय कार्यालयाचे कामकाज पाहत असतांना शहराच्या विविध ज्वलंत प्रश्नांसाठी सन्मा.सदस्य आणि प्रशासन यांचा समन्वय राहावा यासाठी विविध समिती स्थापन करुन यामध्ये सन्मा.सदस्य प्रमुखपदी ठेवून संबंधीत विभागाचे अधिकारी व नगरसदस्य यांची समिती गठीत (उदा.आरोय समिती व इतर) करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.करुणाताई चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमाक ३ मामुर्डी गावठाणातील सर्व्हे नं.४ याठिकाणी असलेल्या चौकास व अंडरग्राऊंड सबवेस कै.महादू रामचंद्र राऊत असे नामकरण करुन फलक लावण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४ मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने येणारे ऐनवेळचे विषय

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/22/२०१९
दिनाक - 4/2/२०१९